पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी १८
मा.शहर सुधारणा समिति
कार्यपत्रिका क्रमांक – १८

**सभावृत्तांत**

दिनांक : १६/०१/२०१३ वेळ : दुपारी ३.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक १६/०१/२०१३ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. बो-हाडे शुभांगी संजय - सभापती
२) मा. यमुनाताई रमणनाना पवार
३) मा. बहिरवाडे नारायण सदाशिव
४) मा. म्हेत्रे सुरेश रंगनाथ
५) मा. सावळे सिमा रविंद्र

याशिवाय मा.गावडे - सहा.आयुक्त, मा.चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.ढगे - कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**दिनांक ०२/०१/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १७) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.**

----------

ठराव क्रमांक - ६९ विषय क्रमांक : १
दिनांक : १६/०१/२०१३ विभाग : झोनिपु
सुचक : मा. यमुनाताई पवार अनुमोदक : मा.सुरेश म्हेत्रे
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/३/कावि/५०२/२०१२, दि.२९/१२/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

शासन निर्णय क्र.झोपसु-२०१०/प्र.क्र.१(भाग-१)/झोपसु-१ दि.२९/०६/२०१२ शासन निर्णय क्र. झोपसु-२०१०/प्र.क्र.१ /झोपसु-१ दि.२ जानेवारी २०१२ नुसार महापालिका क्षेत्रातील अर्हता दिनांकापूर्वीच्या संरक्षणपात्र झोपडया हस्तांतरीत करण्यासाठी निवासी प्रयोजनाकरीता वापरावयाच्या झोपडीकरीता र.रु.४०,०००/- आणि अनिवासी व संयुक्त वापरातील झोपडीकरीता र.रु.६०,०००/- हस्तांतर शुल्क आकारणीकरुन हस्तांतर करणेचा शासन निर्णय तसेच शासन निर्णय क्र. झोपसु-२०१०/प्र.क्र.१(भाग-१)/झोपसु-१ दि.२९ जून २०१२ नुसार सदरचे हस्तांतरण

शुल्क रक्कम शासनाकडे जमा करणेचा आदेश मा. महापालिका सभेचे अवलोकनार्थ पाठविणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ७० विषय क्रमांक : २

दिनांक : १६/०१/२०१३ विभाग : झोनिपु स्थापत्य

सुचक : मा. सुरेश म्हेत्रे अनुमोदक : मा. सिमा सावळे

संदर्भ : मा. महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/२६/२०१३ दिनांक ०९/०१/२०१३

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रभाग क्र.३६ मधील आनंदनगर झोपडपट्टी येथे महिलांसाठी व पुरुषांसाठी दुमजली २६ सीट्सचे शौचालय बांधणेचे काम मे. सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हिसेस ऑर्गनायझेशन यांना थेट पध्दतीने द्यावयाचे झाल्यास अंदाजपत्रकीय खर्चात वाढ होणार असल्याने प्रस्तावात नमुद प्रमाणे प्रपत्र ब मधील तपशिलाप्रमाणे सुधारित प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**(बो-हाडे शुभांगी संजय)**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड मनपा, पिंपरी १८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३६/२०१३
दिनांक : १६/०१/२०१३

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत : सर्व संबंधीत शाखा प्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.